# वसई-विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती (ई) नालासोपारा

जा.क्र.वविशम/साप्रवि/४७३/१९-२०
दिनांक :- २०/८/२०१९

### फेर जाहिर दरपत्रक सूचना

वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील तलावांवर दिड दिवस, सात दिवस, गौरी विसर्जन व अनंत चतुर्थीचे सार्वजनिक व घरगुती गणपती मुर्तीचे मोठया प्रमाणात विसर्जन दरम्यान सी.सी.टि.व्ही. कॅमेरा भाडयाने घेणेकामी दरपत्रक मागविणेकामी जाहिर दरपत्रक सुचना दि. २०/०८/२०१९ रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि. २३/०८/२०१९ रोजी ४.०० वाजेपर्यंत vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई ) नालासोपारा (प.) कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेंत येत आहे. दरपत्रक धारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि. २३/०८/२०१९ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा, सामान्य प्रशासन विभागात सादर करावेत. प्राप्त झालेले दरपत्रक दि. २३/०८/२०१९ रोजी सायं. ४.३० वाजता शक्य झाल्यास ठेकेदार व स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष प्र.सहा.आयुक्त यांचे दालनात उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | नग | कर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ४ चॅनेल डिव्हीआर<br>बुलेट आय आर कॅमेरा<br>१२ व्होल्ट ५ ॲम्पीयर पावर सप्लाय<br>५०० जीवी हार्ड डिस्क<br>वीएनसी कनेक्टर<br>पावर सप्लाय कनेक्टर<br>सीसी टीव्ही केबल (आरटी ३)<br>प्रोजेक्टर आणि स्क्रीन, केबल मेन पॉवर देखभाल, मनुष्यबळासह कार्यन्वित करणे | १ नग<br>४ नग<br>१ नग<br>१ नग<br>८ नग<br>४ नग<br>२०० मीटर<br>२० मीटर | | |

### अटी-शर्ती

१. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन साक्षांकित केलेले व सशर्त दरपत्रक फेटाळण्यात येईल.

२. दरपत्रकाचे लिफाफे सिल केलेले असावेत. एकदा सादर केलेली दरपत्रके विनंती अर्ज देऊनही परत घेता येणार नाही.

३. ठेकेदाराने दर सादर करताना कामाची पहाणी करुन सर्व करासहित दर सादर करावेत.

४. दरपत्रक धारकाने पॅनकार्ड, GST क्रमांक/नोंदणी बंद लिफाफ्यामध्ये सादर करावेत.

५. मंजुर ठेकेदारास आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

६. कामाबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास महापालिकेचा निर्णय अंतिम राहील व त्यांचे पालन दरपत्रक धारकास बंधनकारक राहील.

७. फक्त पात्र दरपत्रक धारकांनी सादर केलेल्या किंमतीच्या दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि एल-१ एकुण किमतीच्या आधारे घेण्यात येईल.

८. मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार प्र.सहा.आयुक्त यांना राहील.

९. बिल अदा केलेनंतर लेखापरिक्षणास काही आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करुन देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner